विशेष दिवाणी दावा क्र.९/२०१७
गंगाधर .. वि .. संभाजी
वादी तर्फे सा.क्र.६ **(नि.क्र.४५०)**

**शपथेवर सत्य कथन करतो की,**

**माझे नांव:-** दिनेश भिक्कन पाटील , **वय:-** ५४वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी , **रा.**अहमदपूर**, ता.**अहमदपूर जि.लातूर.

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने सुरु.**

**१.** मी महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमीटेड शाखा अहमदपूर येथे उपकार्यकारी अभियंता पदावर १३/०८/२०२५ पासून कार्यरत आहे. मला न्यायालयीन समन्स आहे. समन्समध्ये नमूद केल्यानुसार मी आज रोजी या दाव्याच्या अनुषंगाने संबंधीत कागदपत्रे आणलेली आहेत. मी आज रोजी वादी व प्रतिवादी यांची आमच्या कार्यालयात उपलब्ध असलेली वीजबीले आणलेली आहेत. भाग्यशाला संभाजी देपे, देपे गंगाधर अंतराम, वर्षा गंगाधर देपे, सुलोचना गंगाधर देपे, देपे वरुण गंगाधर, सुलोचना गंगाधर देपे हीचे दुसरे कनेक्शन याचे बील अशी एकुण सहा बीले आणलेली आहेत.

**२.** भाग्यशाला वगळता बाकीच्या व्यक्तीपैकी देपे गंगाधर, वरुण देपे व सुलोचना देपे यांचे कनेक्शन सन २००४ सालातील आहे. वर्षा गंगाधर देपे व सुलोचना गंगाधर देपे यांचे कनेक्शन सन २०११ सालातील आहे. सदर कनेक्शन कृषी पंपासाठीचे आहेत.

**३.** भाग्यशाला हिच्या नावचे कनेक्शन व्यक्तीश तिच्याच नावे देण्यात आले की, तिच्या नावावर वर्ग करण्यात आले हे मला सांगता येत नाही. अज्ञान व्यक्तीच्या नावेही आम्ही विदयुत पुरवठा देतो. प्रत्येकाचे ग्राहक क्रमांक वेगवेगळे आहेत. नि.क्रं.३५६ हे आमच्याच ऑफीसचे आहे. आमच्याकडील चोरी प्रकरण १६९/२००४ आहे. वीज चोरीचा भरणा १,१६,१३२/- भरल्याचे नि.क्रं.३५६ वरुन दिसते. गंगाधर देपे व वरुण देपे व सुलोचनाबाई देपे यांनी प्रत्येकी २३४७०/- इतकी रक्कम वीज बोर्डाकडून केलेल्या मागणीनुसार भरलेली आहे.

**४.** हरीबाई अंतराम देपे यांच्या नावे आमच्याकडे कृषी जोडणीसाठी खाते होते. आता मला दाखविलेली हरीबाई देपे यांनी भरणा केलेल्या

रक्कमेची पावती आता मला दाखविली. ती बरोबर आहे. त्यावर आमच्या खात्यातील संबंधीतांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी ४५१** देण्यात येते. यासोबतच वीजबील आता मला दाखविले ते हरीबाई अंतराम देपे यांचे नावचे आहे. ते आमच्या कंपनीचे आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४५२** देण्यात येते. निक्रं.१८७ व १८८ या भाग्यशाला नावच्या आहेत. नि.क्रं.१८९ ही संभाजी यांच्या नावची आहेत. संभाजीच्या नावे कोपरा गावी वीजपुरवठा केल्याबद्दल आमच्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. भाग्यशालाने थकीत बील मागणीपोटी बील भरल्याचे पावती आता मला दाखविली. तानाजी देपे, शांताबाई देपे व राहुल देपे यांच्याबद्दल वीज जोडणी असल्याबद्दल आमच्याकडे काही पुराव आहे का, यास माझे सांगणे की, असल्यास मी दाखल करेल. भाग्यशालाला दिलेलया जोडणीबद्दल आमच्याकडे रेकॉर्ड असेल तर मी देईन. भाग्यशालाच्या नावे १० एचपीचे कनेक्शन आहे. ते क नेक्शन विहीरीवर आहे, नदीवर आहे की, तलावावर आहे हे पाहिल्याशिवाय मला देत नाही. भाग्यशाला हीला नेमक्या कोणत्या पानाच्या स्त्रोतामधून पाणी उचलायचे होते हे आज मला सांगता येत नाही.

(उर्वरीत रेकॉर्ड आणेपर्यंत तहकूब.)

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक ३०/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

**<u>उर्वरीत सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.एस.शेळके यांच्यावतीने शपथेवर सुरु.</u>**

**०५.** भाग्यशालाच्या नावे वीज कनेक्शन कसे आले याबद्दल मी कागदपत्रे शोधली, मात्र ती मिळाली नाहीत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.बी.एन.पौळ यांच्यावतीने सुरु.</u>**

**०६.** मी वादींना ओळखत नाही. भाग्यशालाच्या नावचे वीज बील मी दाखल केले आहे. भाग्यशालाच्या नावचे वीज कनेक्शन आहे, याची खात्री मी करुन घेतली आहे. शाखा अभियंता अमोल मुंडे व तारतंत्री विशाल पाटील यांच्याकडून मी सदर खात्री केली. भाग्यशालाच्या नावचे वीज कनेक्शन स.क्र.६/1 मधील विहीरीवर आहे, यास माझे सांगणे की, स.क्रमांक मला सांगता येत नाही. मात्र, विहिरीवर कनेक्शन आहे. कारण आमच्याकडील रोहीत्र क्र.७३२१५७२ या रोहीत्रावरुन ती वीज दिली आहे. विशाल पाटील व अमोल मुंडे यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून या वीज जोडणीचा पंचनामा केला आहे. सदर पंचनामा आजरोजी मी आणला आहे. तो मी हजर करायला तयार आहे. (उलटतपासादरम्यानच सदर पंचनामा हजर करण्यात आला. सदर पंचनामा प्रतिवादींना मान्य असल्याने त्यास **<u>नि.क्र.४५२/२</u>** देण्यात येते). सदर पंचनाम्यामध्ये एक फोटो आहे. त्यासोबत एक नकाशा असून त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर पंचनाम्याच्या वेळचे अधिकारी श्री. विशाल पाटील व अमोल मुंडे यांची सही आहे. तसेच, माझी सही आहे. फोटोतील अक्षांश व रेखाशावरुन स.क्रमांक सांगता येणार नाही. हे खरे की, वादीवर वीज चोरीचे प्रकरण होते. त्याचा क्र.१६९/२००४ आहे. सदर वीज चोरी जास्त रक्कमेची होती, मात्र तडजोडीत ती रक्कम १,१६,१३२/- होती याबद्दल मला माहिती नाही. वादीला मी ओळखत नाही. कनेक्शन देण्यापुर्वी त्या विहिरीची नोंद ७/१२ सदरी आहे का हे पाहिले जाते. गंगाधर किंवा सुलोचना यांच्या ७/१२ सदरी विहिर किंवा बोअर याची नोंद आहे का हे मला सांगता येणार नाही. पुर्वी

अर्जाची नोंद करण्यासाठी रजिस्टर ठेवले जात असे. त्या रजिस्टरमध्ये संभाजी देपे यांच्या नावाची नोंद आहे का हे मी आज सांगू शकणार नाही. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी सरतपास दिला.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक १०/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.

**वादीतर्फे सा.क्र.६ (नि.क्र.४५०)**